# अनु.जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांकरीता मिनी ट्रॅक्टरचा पुरवठा करणे.

१) शासन निर्णय क्र.एसटीएस-२०११/प्र.क्र.४३९/अजाक-१, दि.६ डिसें.२०१२

२) शासन निर्णय क्र.एसटीएस-२०१६/प्र.क्र.१२५/अजाक-१, दि.८ मार्च २०१७

योजनेचे उद्देश :- या योजनेंतर्गत स्वयंसहाय्यत बचतगटांना त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे, या हेतुने त्यांना देण्यात आलेला मिनी ट्रॅक्टर इतर शेतकऱ्यांना भाडेतत्वावर देवू शकेल व त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

अटी व शर्ती :-

१) लाभार्थी बचत गटात एकुण सदस्यापैकी ८०% अनु.जातीतील असावेत.
२) लाभार्थी बचत गटाचे बँकेत खाते असावे.
३) जातीचे दाखले सक्षम अधिकाऱ्याने प्राधिकृत केले असावे.
४) शासन अनुदान ९०% लाभार्थी बचत गटास १०% (रु.३५०००) भरावे लागेल.
५) शासन निर्णय दि.८.३.२०१७ प्रमाणे सुधारीत केल्याप्रमाणे आता बचत गटाच्या आधारलिंक बँक खात्यात बचत गटांनी निवड केलेल्या ट्रॅक्टर कंपनी निवडीनुसार ५०% रक्कम बचत गट बँकाच्या बँक खात्यावर व विमा / आर.टी.ओ. नोदणी केल्यानंतर ५०% रक्कम देण्याची तरतुद असुन बचत गटांना त्यांच्या स्वयं इच्छेप्रमाणे ट्रॅक्टरच्या एकुण किंमतीप्रमाणे व शासनाच्या रु.३१५०००/- कमाल मर्यादेत ट्रॅक्टर खरेदी करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.